आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक १४ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. आयआयटीच्या धर्तीवर मुंबईत आता इंडियन इंस्टियुट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी आयआयसीटी स्थापन होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेव्हज या शिखर परिषदेविषयी आयोजित सत्रात घोषणा.

2. आज सर्वत्र धूलिवंदन आणि होळीचा उत्साह; राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांनी दिल्या जनतेला शुभेच्छा.

3. यवतमाळ जिल्ह्यात बंजारा समाजाचा रंगोत्सव मंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत साजरा, बोरी गदाजी मध्ये रंगली गोटमार होळी.

4. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने मिळवला देशभरात दुसरा क्रमांक.

वेव्हज

देशातील प्रतिष्ठित अशा आयआयटी संस्थेच्या धर्तीवर इंडियन इंस्टियुट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) मुंबईच्या गोरेगावात उभारण्यात येईल व यासाठी केंद्र शासन 400 कोटी रूपयांची आर्थिक मदत करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्ली येथे दिली. भारताच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या जागतिक दृक-श्राव्य मनोरंजन शिखर परिषद अर्थात वेव्हज 2025 च्या पहिल्या सत्राचे आयोजन सुषमा स्वराज भवन येथे करण्यात आले. या सत्रात मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली. जागतिक स्तरावर होणा-या या पहिल्या परिषदेचे यजमान पद महाराष्ट्र राज्याला मिळाले असून, राज्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले. राज्याच्या आर्थिक राजधानीत 1 ते 4 मे 2025 दरम्यान मुंबईतील जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे ही भव्य परिषद संपन्न होणार आहे. शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात विविध देशांच्या राजदूत आणि उच्चायुक्तांनी सहभाग घेतला. या बैठकीत केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव व राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले विचार मांडले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय व महाराष्ट्र शासन दरम्यान ‘वेव्हज 2025’ निमित्त सामंजस्य करार झाला. या सत्राचे प्रास्ताविक केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजु यांनी केले तर आभार केंद्रीय माहिती व प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी केले.यावेळी राज्याच्या मुख्य

सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे,उद्योग विभागाचे प्रधान सचिव एल.अनबलागन उपस्थित होते.

<u>होळी शुभेच्छा</u>

राज्यसह विदर्भात आज धूलिवंदनाचा सण उत्साहाने साजरा होत आहे. होळी पौर्णिमेनिमित्त काल जागोजागी होळया पेटवण्यात आल्या. अनेक ठिकाणी स्थानिक देवतांच्या पालख्या यावेळी मिरवणुकीने नेल्या जातात. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळीचा सण भारताच्या अमूल्य सांस्कृतिक वारशाचं प्रतीक असून तो एकता, प्रेम आणि सौहार्दाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशातून सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळी हा सण म्हणजे चांगल्याचा वाईटावर विजय आणि वसंत ऋतुच्या आगमनाचं प्रतीक आहे, असं धनखड आपल्या संदेशात म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आनंदाने भरलेला हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन उत्साह आणि उर्जा आणेल, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. होळी आणि धुळवडीनिमित्त आज शेअर बाजार बंद आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत पर्यावरणीय समृद्धीची प्रतिज्ञा करुया असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाणे इथं किसननगर परिसरात सहकुटुंब होलिकापूजन केलं. धूलिवंदनानिमित्त रंग खेळण्यातून सकारात्मक प्रेरणा मिळाव्या अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत. नागरिकांनी पर्यावरणपूरक होळीचा मार्ग स्वीकारून नैसर्गिक रंग वापरण्यात पुढाकार घेतल्या बद्दल त्यांनी समाधान वयात केलं.

*आज धुळवळ आहे. या धुळवळीच्या देखील शुभेच्छा सर्वांना. पर्यावरणपूरक होळी आणि धुळवड साजरी करावी, असं आवाहनवजा विनंती. पर्यावरणपूरक नॅचरल रंगांची होळी आपण खेळतो आहे आणि खऱ्या अर्थाने गेल्या अनेक वर्षामध्ये नागरिकांनी देखील हे आत्मसात केले आणि पर्यावरण पूरक होळी सगळीकडे आपण साजरी करताना पाहतो याचा आनंद आहे.*

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही होळी आणि धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नागरिकांनी धुळवड खेळताना पाण्याचा अपव्यय टाळावा तसंच आरोग्याची काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं आहे.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी

येत्या २ वर्षात शेअर बाजारात नोंदणी करण्याचं महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचं नियोजन आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी दिली. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत याचे सूतोवाच केलं होते. येत्या ५ वर्षात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांपासून मिळणाऱ्या वीजेचे एकूण वीज वितरणातलं प्रमाण १३ टक्क्यांवरुन ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

विधी सेवा महाशिबीर

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे येत्या 16 मार्च रोजी श्री सती अनुसया माता मंदीर, पारडसिंगा, तालुका काटोल येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्यात नागपूर जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालये सर्व नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध विधी सेवा व शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देवून पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रत्यक्ष लाभ दिला जाणार आहे. मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय लोकसंपर्क ब्युरो नागपूरद्वारे नव्या भारताचे नवे कायदे भारतीय न्याय संहिता 2023 या विषयावर मल्टी मिडीया छायाचित्र प्रदर्शन करण्यात येणार आहे.

बंजारा होळी/ गोटमार होळी/

यवतमाळ मध्ये पालकमंत्री संजय राठोड आणि परिवाराच्या उपस्थितीत बंजारा समाजाचा रंगोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी लेंगी नृत्यावर उपस्थितांनी ठेका धरला. बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या होळी उत्सवाला यंदा खास स्वरूप देत, बंजारा समाज बांधव या रंगोत्सवात एकत्र आले. होळी विषयी मंत्री संजय राठोड यांनी मनोगत व्यक्त केलं.

*होळी सण बंजारा समाजाची आमची पूर्वज पूर्वी महिनाभर साजरा करत होते आणि जन्ममृत्यु या सर्व आणि वर्षभराच्या घटनांशी आधारित होळीच्या या सणाला महत्व आहे. सर्वसामान्य लोकांची होळी ही काल सायंकाळी जाळल्या जाते आणि बंजारा समाजाची होळी आज सकाळी या ठिकाणी त्याच दहन होते. या निमित्तानं समाज बांधव मोठ्या प्रमाणात एकत्र जमतो आणि सर्व मनातले वर्षभरातले भेद एकामेकाबद्दल आपसामध्ये काही मनभेद झाले असतील मतभेद झाले असतील ते सर्व बाजूला काढून या होळीच्या निमित्तानं परत एकत्र होऊन याठिकाणी एकत्र काम करण्याच सुरुवात आमच्या होळी मध्ये या ठिकाणी केल्या जाते.*

तांड्यात होळी पुजन नंतर परंपरेनुसार रंगांची उधळण, लेंगी नृत्य, बंजारा हास्यरंग कार्यक्रम आणि स्नेह-मिलन आयोजित करण्यात आले. समाजातील एकोपा, सांस्कृतिक वारशाचे जतन, आणि परंपरांचे संवर्धन याचे प्रतीक या उत्सवात दिसून आले. बंजारा समाजाच्या चिरंतन संस्कृतीला उजाळा देण्यासाठी हा रंगोत्सव पार पडला. दरम्यान यवतमाळ च्या मारेगाव तालुक्यातील बोरी येथील संत गदाजी महारांच्या यात्रेत गोटमार होळी रंगली. फाल्गुन पौर्णिमेपासून या यात्रेला प्रारंभ होतो. येथील गोटमार होळी विदर्भात प्रसिद्ध आहे.

<u>सूर्यघर</u>

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात १० मार्च २०२५ पर्यंत एकूण १० लाख ९ हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र आपलं योगदान देत राहील तसंच २०२६-२७ पर्यंत १ कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. दरम्यान २२ जानेवारी रोजी, राज्यात नागपूर जिल्ह्याने सर्वाधिक 16 हजार 949 घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

<u>इग्नु</u>

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) चा ३८ वा दीक्षांत मुख्य समारंभ इग्नु मुख्यालय नवी दिल्ली येथे नुकताच पार पडला या दीक्षांत समारंभासाठी मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान उपस्थित होते. विविध विद्याशाखेतील देशातील एकूण ३ लाख १३ हजार ७७० स्नातक पात्र ठरले आहेत. यात 'इग्नु' नागपूर केंद्राचे दोन विद्यार्थी सुवर्ण पदकाचे मानकरी ठरले आहे. चंद्रपूर जिल्यातील वणी येथील व्यवसायाने शेतकरी असलेले राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर अध्ययन केंद्राचे विध्यार्थी अभिजीत

दुमोरे, ह्यांना एम.बी.ए. वित्तीय व्यवस्थापन मधील सुवर्ण पदक आणि इन्स्टिटयूट ऑफ सायन्स अध्ययन केंद्रातील विध्यार्थी रोहन गुप्ता, रेल्वेतील कनिष्ठ अभियंता, काटोल ह्यांना एम.एस्सी. पर्यावरण शास्त्र मधील सुवर्ण पदक प्रदान करण्यात आल. सुवर्ण पदक मिळाल्याबद्दल इग्नु नागपूर केंद्राचे विभागीय संचालक डॉ.लक्ष्मण कुमारवाड, यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

<u>जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन</u>

नागपूर जिल्ह्यातील काटोल, नरखेड तालुक्यात व इतर ठिकाणी दरवर्षी काही गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. इतर तालुक्यात जे लहानमोठे नदी, नाले, ओहोळ आहेत ते पावसाने काठोकाठ वाहिल्यामुळे पुराचा प्रश्न उद्भवून मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप होते. पाणीटंचाई आणि अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या संकटाचा सामना करण्याची वेळ येऊ नये यादृष्टीने जलसंधारणाची कामे करणे आवश्यक असून जिल्ह्यातील किमान दीड हजार जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. नियोजन भवन येथे जिल्ह्यातील विविध विभागांच्या विकास कामांची आढावा बैठक पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे आणि सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

******